# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक ३१७/२०२४ दिनांक- २०/०८/२०२४.

## "फसवणुक करणाऱ्या आरोपीस ताब्यात घेवून ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

फिर्यादी यांचे मनी ट्रान्स्फरच्या दुकानात जावून रोख रक्कम बँक खात्यांवर ट्रान्स्फर करावयास सांगून पैसे ट्रान्स्फर झाल्यानंतर रक्कम ॲक्टीवा गाडीच्या डिक्कीत विसरली आहे आणून देतो बहाणा करुन आरोपी पैसे न देता गाडी घेवून पळून जात होता. अश्या प्रकारे मनी ट्रान्सफर दुकानदाराची फसवणुक केल्याने नमुद इसमाचे विरुध्द काशिगांव पो.स्टे. गुनोक्र. २३७/२०२४ भारतीय न्याय संहीता अधिनियम २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी आयुक्तालयाचे अभिलेखावरील फसवणुक तसेच शरीरा व मालमत्ते विरुध्द गुन्हे तात्काळ उघडकीस आणणे बाबत सुचना दिल्या असल्याने प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख यांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांचे आदेशा प्रमाणे सुचना दिल्या होत्या.

मध्यवर्ती गुन्हे शाखेतील पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सफौ.मनोहर तावरे, पोहवा/संग्राम गायकवाड यांनी वरील गुन्हयातील आरोपीची तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळवून सापळा रचून पाहीजेत आरोपी यास तिवारी कॉलेजचे पाठीमागील सार्वजनिक रोडवर, मिरारोड पुर्व येथे दिनांक १५.०८.२०२४ रोजी १६.०५ वाजे सुमारास शिताफीने ताब्यात घेवुन त्याचे नाव विचारता त्याने आपले नाव यासीन मोहम्मद युनुस शेख, वय-२० वर्षे रा.सी विंग,रुम क्र.५०१, क्लोरोलीन बिल्डींग, जी.सी.जी. क्लबचे जवळ, हाटकेश, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे असे असल्याचे सांगितले. नमुद पाहीजेत आरोपीकडे सदर गुन्हयाची प्राथमिक तपास करता त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

१) काशिगांव पो.स्टे. गुनोक्र. २३७/२०२४ भारतीय न्याय संहीता अधिनियम २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे.
२) नवघर पो.स्टे.गुनोक्र. ४६०/२०२४ भारतीय न्याय संहीता अधिनियम २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे.
३) नवघर पो.स्टे.गुनोक्र. ४५९/२०२४ भारतीय न्याय संहीता अधिनियम २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे.
४) नयानगर पो.स्टे.गुनोक्र. ३५१/२०२४ भारतीय न्याय संहीता अधिनियम २०२३ कलम ३१८(४) प्रमाणे.

तरी नमुद पाहीजेत आरोपी विरुध्द वरील प्रमाणे फसवणुकीचे ४ गुन्हे नोंद असुन वरील गुन्हयात पुढील कायदेशीर कार्यवाही करीता काशिगांव पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि. नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सहापोउपनिरी. श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. संग्राम गायकवाड, राजाराम काळे, हनुमंत सुर्यवंशी, संतोष मदने, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, सतिष जगताप, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, नितीन

राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

**----------0000---------**